**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# हानिकारक परिणाम टाळण्यासाठी पृथ्वी हरित करणे काळाची गरज : डॉ. माने

▲ पाटण, दि. ३० : पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे संपूर्ण जगभरातील देशांपुढे आज समस्या निर्माण झाली आहे. वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीच्या वातावरणात खूप मोठे बदल घडून येत आहेत. अतिनील किरणांमुळे पृथ्वीवरील सजीवांवर हानिकारक परिणाम होत आहेत. यातून जर आपणास सुटका हवी असेल तर पृथ्वी हरित करणे ही काळाची गरज आहे, असे मत माजी भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी. यु. माने यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये ओझोन दिनानिमित आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. यावेळी ग्रंथपाल अनिल पाटील, आय. क्यू.ए. सी. समन्वयक डॉ. हेमलता काटे, भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप तडाखे, गणितशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. आर. फडतरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. माने म्हणाले, सूर्यापासून निघणारी अतिनील किरणे माणसामध्ये व इतर प्राण्यांमध्ये विविध आजार उत्पन्न करू शकतात. आपल्या पृथ्वीवरील सजीवसृष्टीला सुरक्षित ठेवण्यात ओझोन थराचा मोठा वाटा आहे. त्याचबरोबर भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. जगाच्या पाठीवर कोणत्याही देशात इतकी विविधता आपणास पाहायला मिळणार नाही. पण हे निसर्ग सौंदर्य तसेच सजीवसृष्टी जर वाचवायची असेल तर झाडे नुसती लावून चालणार नाही तर ती जगवली पाहिजेत, वाढवली पाहिजेत, प्रदूषण कमी केले पाहिजे. यासाठी आपण सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करूयात, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी भूगोलशास्त्र ही सर्व शास्त्राची जननी आहे तसेच कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात स्वतःपासून करावी. पर्यावरण रक्षण हे आपणा सर्वांचे प्रथम काम असल्याचे सांगितले. प्रारंभी पृथ्वीगोलास पुष्प वाहण्यात आले. त्यानंतर डॉ. संदीप तडाखे यांनी प्रास्तविकात ओझोन दिवस याबद्दल माहिती सांगितली. अनिल पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्रा. बळीराम लोहार, प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. उमेश भोसले, प्रा. लक्ष्मण गणगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांच्याकडे पुस्तके भेट देताना डॉ. सी. यु. माने व इतर.

**महाविद्यालयास १२५ पुस्तके भेट**

बाळासाहेब देसाई कॉलेजचे माजी भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी. यु. माने यांच्याकडून महाविद्यालयास जवळपास १२५ पुस्तके यात ग्रंथ, विविध अभ्यासक्रमावरील पुस्तके, संदर्भ ग्रंथ भेट स्वरूपात देण्यात आले. ते बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणमध्ये ३६ वर्ष कार्यरत होते. त्यांनी स्वतः जवळपास २८ पुस्तकांचे लेखन केले असून १६ देशांचे पर्यटन केले आहे. विद्यार्थ्यांनी वाचन करावे, अभ्यास करावा व आपले ध्येय प्राप्त करावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आपण ही पुस्तके भेट देत आहोत असे डॉ. सी.यु. माने यांनी सांगितले.

# डॉ. अब्दुल कलाम यांचे व्यक्तिमत्व जागतिक दर्जाचे : डॉ. प्रशांत फडणीस

**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**पाटण, दि. १६ ऑक्टोबर:** इंग्लड क्रिकेट संघाचा ११ कसोटी खेळणाऱ्या देशांकडून पराभव

डॉ. अब्दुल कलाम यांनी फक्त भारत देशाला नाही तर जगाला तंत्रज्ञानात पुढे नेले. म्हणून डॉ अब्दुल कलाम यांचे व्यक्तिमत्व हे जागतिक दर्जाचे होते. डॉ. अब्दुल कलाम ज्यांना मिसाईल मॅन म्हणतात त्यांनी प्रत्येक वयात देशाची सेवा केली, त्यांच्या ज्ञानातून त्यांनी देशाला अनेक क्षेपणास्त्रे दिली आणि देशाला शक्तिशाली बनवले. असे मत अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत फडणीस यांनी व्यक्त केले. ते बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन निमित आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण व ग्रंथालय समिती यांच्या संयुक्तपणे डॉ. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसा निमित्ताने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत फडणीस तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रंथपाल अनिल पाटील, डॉ. हेमलता काटे, डॉ. विनायक राऊत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला



डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या फोटोस पुष्प वाहून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर ग्रंथपाल अनिल पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले त्यामध्ये त्यांनी वाचन प्रेरणा दिन व ग्रंथालय समितीची थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. प्रशांत फडणीस यांनी डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनाविषयी थोडक्यात माहिती सांगितली अब्दुल कलाम जनतेसाठी एक लोकप्रिय आणि प्रेरक व्यक्तिमत्व होते. भारत सुरक्षित व्हावा या उद्देशाने त्यांनी पृथ्वी, अग्नी सारखी क्षेपणास्त्रे दिली. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या कलाम यांना देश शक्तिशाली आणि स्वावलंबी बनवायचा होता. त्यांनी देशाला मौलिक विज्ञानात स्वावलंबी बनवले. मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले की, भारतरत्न माजी राष्ट्रपती मिसाइल मॅन, थोर वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. मवाचाल तर वाचालफ मशिकाल तर टिकालफ मज्ञानाची पाहिजे खात्री, तर पुस्तकांशी करा मैत्रीफ या संकल्पना यावेळी उदाहरणे देऊन स्पष्ट करण्यात आल्या. दररोज आपण नित्यनेमाने काहीतरी वाचले पाहिजे म्हणजे आपल्या ज्ञानात भर पडेल. तसेच फक्त शालेय अभ्यासक्रमा पुरते वाचू नका तर जीवन चांगले जगण्यासाठी सुद्धा वाचन आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. एच.व्ही. काटे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी प्रा. बळीराम लोहार, प्रा. श्रीगणेश गायकवाड,प्रा.एस. पी.रोडे, प्रा.पट्टेबहादूर. प्रा. आयेशा आतार ग्रंथालय कर्मचारी सुर्यकांत देवकांत, सीमा मराठे , अस्मिता घाडगे, महादेव कदम यांच्यासह बीए. बी.कॉम, ब बी.एस.एस्सी चे विद्यार्थी उपस्थित होते.